५) लाभार्थीस देणेत आलेल्या सदनिकेच्या बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रास लागू असतील त्याप्रमाणे त्यांचेकडील अटी व शर्ती बंधनकारक असतील. लाभार्थीने सदर अटी व शर्तींचा भंग केल्यास सदनिकेचा ताबा काढून घेण्यात येईल व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमणदार म्हणून पुन्हा सदनिका मिळणेबाबत व पुनर्वसना बाबत हक्क सांगता येणार नाही.

६) लाभार्थीला देण्यात आलेली सदनिका ही नवीन अविभाज्य शर्तीने देणेत आलेली असून सदर सदनिकेचे १० वर्षापर्यन्त हस्तांतरण,गहाणखत, विक्री, तारण कुलमुखत्यार पत्र देणे, भाडेपट्टयाने देणे इ. प्राधिकृत अधिका-याच्या परवानगी शिवाय, करता येणार नाही.

७) लाभार्थीने वरील अटी व शर्तीचा भंग केल्यास सदनिकेचा ताबा काढून घेण्यात येईल.

८) लाभार्थीने रहात असलेल्या सदनिकेच्या देखभाली व दुरुस्तीचा खर्च, महापालिकेचा कर, पाणीपट्टी, विजेचे बिल तसेच इतर सर्व करासंबंधी खर्च स्वतः करावयाचा आहे.

९) सदरचे अटी व शर्ती मान्य असले बाबतचे "बंधपत्र" मूळ पावतीसह सादर करणे.

जा.क्र.ब/२०/जमीन/ २९९४/२००७-०
बोरीवली, दिनांक १९-५-२००७

(डॉ.पी.एन.मुंडे)
वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,
बोरीवली

प्रति, श्री जाधव सुनील प्रभाकर
२५. शांतीनगर



प्रत :- वनक्षेत्रपाल(संरक्षण) सं.गां.रा.ऊ. बोरीवली व वनक्षेत्रपाल, तुळशी कार्यवाहीसाठी रवाना.

२/- सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या सदनिकेचा ताबा शर्त क्र.१ मधील रक्कम भरण्याची पुर्तता केलेल्या लाभार्थीस ताब्यात देवून ताबा पावती दोन प्रतीत घ्यावी, त्यापैकी एक प्रत वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना सादर करावी.

प्रतिलिपी :- सहाय्यक वनसंरक्षक (प्रा./संरक्षण) सं.गां.रा.ऊ. बोरीवली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (पुर्व) मुंबई-६६ यांचे कार्यालय
Tel. 28860362 E-mail : sgnpmumbai@rediffmail.com

# आदेश

मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालल्या मुळ रिट याचिका क्र. ३०५/९५ मधील अंतिम आदेश **दि. १५-९-२००३** तसेच रिट याचिका क्र. **२०२५/२००४** मधील नोटीस ऑफ मोशन क्र. **५०३/२००५** मधील दि. **४-५-२००६** चे आदेश तसेच नोटीस ऑफ मोशन क्र. **५५८/२००६** मधील **दि. २९-३-२००७** च्या आदेशानुसार तसेच मुख्य सचिव म.रा., मंत्रालय, मुंबई यांनी **दि. ४ ऑक्टोंबर २००४** रोजी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन जमीनीवरील पात्र अतिक्रमक (उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पर्यायी भूखंडासाठी ज्या अतिक्रमकांनी दिलेल्या मुदतीत ठरवून दिलेली रक्कम वन विभागाकडे भरणा केलेली आहे असे अतिक्रमतक) यांचे पुनर्वसन मौजे चांदीवली येथे विकासक सुमेर कार्पोरेशन व्दारा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमकांकरीता झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत तयार केलेले सदनिकांत करण्याचे निश्चीत झाले असून या आदेशाव्दारे खालील अटी व शर्तीस अधीन राहून चांदिवली स्थित खालील नमूद सदनिकेचे वाटप करणेत येत आहे.

सदनिकेचा तपशिल :- 13A/J/302.

**अटी व शर्ती :**

१) मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार रक्कम रु. ७०००/- चा भरणा, उप वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचेकडे केल्याच्या, मुळ पावत्या पुराव्यासाठी वनक्षेत्रपाल (संरक्षण) सं.गां.रा.ऊ. बोरीवली यांचेकडे प्रस्तुत करावे व संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील अतिक्रमीत जागा मोकळी करण्याबाबतचे वचनपत्र ताबा घेतांना सादर करावे.

२) लाभार्थीने सदर सदनिकेचा ताबा हे आदेश प्राप्त होताच १० (दहा) दिवसात घेणेचा असून दिलेल्या मुदतीत ताबा न घेतल्यास लाभार्थी सदर सदनिका मिळण्यास अपात्र ठरेल व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमणदार म्हणून पुनर्वसनास पात्र राहणार नाही.

३) पात्र ठरलेल्या अतिक्रमकांनी रु. ५०००/- चे भरणा केले असल्यास, एकुण रु. ७०००/- भरणेचे आदेशांनुसार उर्वरित रु. २०००/- चा भरणा "वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली" / "Conservator of Forests & Director, Sanjay Gandhi National Park, Borivali" यांचे नावाने काढून भारतीय स्टेट बँक, ठाणे (प.) शाखे वरील धनाकर्ष मौजे चांदिवली येथील वनक्षेत्रपाल (संरक्षण) यांचे कार्यालयात ताबा घेण्यापूर्वी सादर करावा.

४) लाभार्थीने सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी त्यांच्या कुटूंबासह तीन प्रतीत फोटो सादर करणे आवश्यक आहे. वनक्षेत्रपाल (संरक्षण) यांना पावती वरील नांव व फोटोतील व्यक्ती एकच असल्याची खात्री झालेनंतरच सदनिकेचा ताबा दिला जाईल.